CNR No. MHWR030057142021
नि. फौ. ख. क्र. ८२६/२०२१
सरकार / ऋृतवीक
<u>नि.क्र. १५</u>

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर साक्ष**

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगते की —

माझे नाव : देवयानी किशोर विरूळकर,

वय : २३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण,
रा. : पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. एन. काळे मार्फत</u>**

१. घटना दि. २०/०२/२०२१ रोजी संध्याकाळी ०७:०० वाजताचे सुमारास घडली होती. त्यावेळी मी माझे घरी माझे मोबाईलवर माझे इंस्टाग्राम बघत होते. त्यावेळी ब्राउज करतांना मला एका 'Samiksha_Patil Pvt. Ltd.' या नावाच्या आयडीवर माझा प्रोफाईल फोटो दिसला होता. त्यामुळे मी ती आयडी चेक केली तेव्हा मला त्यावर माझे काही फोटो दिसले होते. तसेच न्यु पोस्टमध्ये काही व्हिडीओज् सुध्दा होते. तेव्हा मी ती फेक आयडी असल्याचे व त्याला फॉलो न करण्याबाबत पोस्ट टाकली होती. तरीसुध्दा बरेच दिवस मला ती आयडी ॲक्टीव्ह दिसली होती. त्यामुळे मी सदर बाब माझे आईला सांगितली होती.

२. त्यानंतर दि. २३/०२/२०२१ रोजी रामनगर पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली होती. सदर तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास अनुक्रमे **नि.क्र. पी—१ व पी—२** देण्यात येतो. मी सदर तक्रारीसोबत पोलिसांना त्या इंस्टा प्रोफाईलचे स्क्रिनशॉट सुध्दा प्रिंटकरून दिले होते. ते प्रिंट अभिलेखावर दाखल आहेत. त्यानंतर पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मी सदर घटनेच्या वेळी साईनगर, रामनगर, वर्धा येथे राहत होते.

३. मी अनोळखी इसमाविरूध्द तक्रार दिली होती. त्यानंतर पोलिसांनी मला ऋृतविक राउत व बघेल यांनी सदर फेक अकांउट बनविल्याचे व त्यावर ते फोटो टाकल्याचे सांगितले होते. मी त्या दोघांना बघितलेले नाही व त्यामुळे मी त्यांना ओळखू शकत नाही.

**सर तपास पुर्ण.**

न्या.दं.प्र.व.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्रीमती आर. एस. वीर मार्फत</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, इंस्टाग्रामच्या सर्चवर ‘समीक्षा पाटील’ असे नाव टाकल्यास त्या नावाच्या ब—याच इंस्टा आयडी येतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्यातील माझी आयडी नक्की कोणती आहे हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्याचे प्रोफाईलवर माझा फोटो असल्याने मी ती ओळखू शकते.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या आयडीवर माझे कोणतेही फोटो आढळले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष,

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2025.11.29 17:37:12 +0530

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा.
दिनांक : २९/११/२०२५

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)